दीप मिटवी अज्ञान

# सर्व शिक्षा अभियान,जिल्हा परिषद,बीड

शिक्षणाचा अधिकार
सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया

पंचायत समितीपरिसर, बीड 431122
कार्यालय :- 02442-225339,229317 फॅक्स:- 02442-222205
ईमेल :- ssabeed@gmail.com


जा.क्र/सशिअ/ /2018-19 0218

दिनांक : 2 NOV 2018

**प्रति ,**

**गटशिक्षणाधिकारी**
**पंचायत समिती सर्व**

- **विषय - "अभिमान वाटावा गावास सा-या ...... विदयार्थ्यांची स्वच्छ व आरोग्यदायी दिवाळी " सुट्टीमधे उपक्रम राबवणे बाबत.**

**" करुन जावी अशी स्वच्छता ,दिपावलीच्या सुट्टीत जाताना...**
**अभिमान वाटावा गावास सा-या ,पुन्हा शाळा सुरु होताना. "**

दिपावली व शालेय मुले व मुली यांचा संबंध अतिशय घनिष्ठ आहे. शाळा सुरु झाल्यानंतर करावयाची कामे , शालेय विविध उपक्रमात सहभागी होणे ,शाळेनंतर घरी , कुटुंबात आई -वडील व वडीलधा-यांना मदत करणे यातुन मिळणारा आनंद या मुली व मुलांसाठी अतिशय वेगळा असतो. अभ्यासासोबत दररोज खेळले जाणारे खेळ रोज सायंकाळी खेळण्यासाठी एकत्र येणारी ही मुले एकमेकांसाठी खरंच प्रेरणा देणारी , मार्गदर्शक व मदत करणारी असतात. याच मानसिकतेचा उपयोग स्वच्छतेच्या उपक्रमात विद्यार्थांना सहभागी करण्यासाठी **" अभिमान वाटावा गावास सा-या विदयार्थ्यांची स्वच्छ व आरोग्यदायी दिवाळी "** या शालेय विद्यार्थ्यांसाठीचा स्वच्छतेच्या उपक्रमाचा समावेश दिवाळी सुट्टीमध्ये करण्यात यावा.

दिपावलीच्या सुट्टीमध्ये शहरी भागातील विद्यार्थी किल्ले तयार करणे तसेच चित्रकला , सुंदर हस्ताक्षर , नृत्यकला ,कराटे अशा विविध वर्गास हजेरी लावतात . मात्र ग्रामिण भागामध्ये अशा उपक्रमांना मर्यादा असतात. ग्रामिण भागातील मुलांची देखील काहीतरी चांगले करण्याची वृत्ती व इच्छा प्रबळ असते. अशा विद्यार्थ्यांना स्वच्छतेच्या उपक्रमात सहभागी करुन घेण्यासाठी नियोजन करण्यात यावे.जिल्हा परिषदेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा या उपक्रमात सहभागी असणार आहे.वर्गशिक्षकाने इयत्ता तिसरी पासुन पुढील वर्गात शिकणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांला नावानिशी दोन कुटुंबे वाटुन दयावी. या सर्व

उपक्रमामध्ये उत्कृष्ट काम करणा-या प्रत्येक शाळेतील एका विद्यार्थ्याची शाळेने निवड करुन दयावी. त्या विद्यार्थ्याला बक्षिस देवुन सत्कार करण्यात येईल.

- **दिवाळीच्या सुट्टीमध्ये करावयाचे उपक्रम -**

**१.स्वच्छ हातात दम आहे :**

शास्त्रीय पध्दतीने हात धुण्याची सवय व आरोग्य यांचा संबंध अतिशय जवळचा आहे. घरातील महिला व लहान मुले व मुली या उपक्रमात सहभागी होवुन तंत्रशुध्द पध्दतीने हात धुण्याची सवय स्वयंपाक करण्यापुर्वी , शौचाहुन परत आल्यानंतर ,लहान बाळाची शी धुतल्यावर , कोणतेही काम केल्यानंतर , काहीही खाण्यापुर्वी नियमित लागावी.विदयार्थ्यांने शास्त्रीय पध्दतीने हँड वॉश लिक्वीडचा शौचालयाचा वापर करुन स्वतःच्या कुटुंबासह इतर दोन कुटुंबाचे घरी जावुन हात धुण्याचे प्रात्यक्षिक करावे.

**२. शौचालयाचा वापर आरोग्याची गुरुकिल्ली :**

शौचालयाचा शाश्वत वापर होण्यासाठी ज्या कुटुंबामध्ये शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे अशा कुटुबांतील सर्व सदस्यांनी शौचालयाचा वापर करावा. लहान बाळाची शी उघडयावर न टाकता शौचालयात टाकण्यासाठी तसेच लहान मुलांना उघडयावर ,घराशेजारी अथवा नालीवर शौचास बसवु नये त्या कुटुंबाकडील टमरेल गोळा करुन शाळा सुरु झाल्यानंतर शाळेत जमा करावे. अशी माहिती दयावी.

**३.शोषखड्डयाची जादु :**

सांडपाणी उघडयावर सोडल्याने मलेरिया , डेंगु असे मोठया साथीचे आजार बळावत आहेत. जीव घेण्या डेंगु पासुन सुटका म्हणजे सांडपाण्याचे व्यवस्थापनच होय .घर तेथे शोष खड्डा तसेच आठवडयातुन शनिवार हा एक दिवस कोरडा दिवस ठेवण्या संबंधी माहिती दयावी.

**४. एक पत्र स्वच्छतेसाठी :**

या उपक्रमातसहभागी झालेल्या विदयार्थ्यांना पत्रलेखनाचा अनुभव यावा. या करिता पोस्टकार्ड प्रत्येक शाळेस उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. या पत्राच्या माध्यमातुन

विदयार्थ्यांनी त्यांच्या मनातील स्वच्छता विषयक भावना कुटुंब किंवा नातेवाईक यांना पोहचवावी व या अनुषंगाने सर्व जिल्हा परिषदेच्या शाळेतील इयत्ता ३ री ते ८ पर्यतच्या सर्व विदयार्थ्यांनी गटशिक्षणाधिकारी यांना दिवाळी संपताच पत्र पाठवावे, शिक्षकांनी विद्यार्थ्याना मार्गदर्शन करावे.

**५.कच-याचे वर्गीकरण :**

घनकचरा व परिसर स्वच्छता याची गावात नियमित चर्चा सुरु आहे. मात्र प्रत्यक्षात बोली भाषेमधे ओला व सुका कचरा असे बोलले जाते. त्यापेक्षा कुजणारा व न कुजनारा कचरा असे वर्गीकरण प्रत्येक कुटुंबात सांगणे गरजेचे आहे. कच-याचे वर्गीकरण करण्यासाठी फार कमी वेळ लागतो. परंतु माहितीअभावी व आळस या दोन्ही बाबी कचरा उघडयावर टाकण्यासाठी लोकांना प्रवृत्त करतात. यासाठी कुजणारा व न कुजणारा कचरा साठविण्यासाठी प्रत्येक कुटुंबात हिरवा व लाल डस्टबिन वापरावा. याची माहिती विदयार्थ्यांना देवुन त्यांना दोन कुटुंबांना माहिती देण्याचे उद्दिष्ट दयावे.

**६.प्लास्टिक ,... पर्यावरणाचा शत्रु :**

प्लास्टिक भविष्यात सजीव सृष्टीचा नाश करणारा पर्यावरणाचा सर्वात मोठा शत्रु आहे. अशी याची जाणिव विदयार्थ्यांना करुन देणे गरजेचे आहे. घर ,बाजार ,धार्मिक स्थळ किंवा दुकानामधील प्लास्टिक पिशवी काढाव्यात. अशा प्लास्टिकच्या पिशव्या विदयार्थ्यांनी जमा कराव्यात आणि शाळा सुरु झाल्यानंतर शाळेत आणुन वर्गशिक्षकांकडे जमा करव्यात. सर्वात जास्त (वर्गात ) प्लास्टीक जमा करुन शाळेस देणा-या विदयार्थ्यांला बक्षिस देण्यात यावे. तसेच जबाबदारी दिलेले कुटुंब कापडी पिशवीचा वापर करतील यासाठी विद्यार्थ्यांनी हट्ट धरावा.

शाळा सुरु होताना दिपावलीच्या सुट्टीत जमा झालेले प्लॉस्टिक आपल्या वर्गशिक्षकाकडे वजन करुन जमा करावे. सर्व शाळामधुन जमा झालेले प्लास्टिक केंद्र निहाय गट शिक्षणाधिकारी कार्यालय जमा करावे.

**७. स्वच्छता - निबंध लेखन व चित्रकला**

स्वच्छतेचा उपक्रम स्वतः पासुन करणे अपेक्षित असल्याने सहभागी झालेल्या विदयार्थ्यांनी त्यांना अपेक्षित असलेले स्वच्छता या विषयावर मुक्त निबंधलेखन तसेच याच विषयावर चित्र काढणे अशा प्रकारचा उपक्रम विदयार्थ्यांनी त्यांची कल्पकता योग्य प्रकारे

वापरावे त्यांच्यामधे सुप्त कला गुणांना वाव मिळावा या उद्देशाने शाळा सुरु होताच हे सर्व निबंध व काढलेले चित्र प्राप्त करुन घेऊन **प्रथम ,व्दितीय ,तृतीय आलेल्या विद्यार्थांना सत्कार करण्यात यावा.** निवडक निबंध व चित्र या कार्यालयास पाठवावे.

**८. स्वच्छता किट**

फेकुन दिलेले खोके , जाड कागद या पासुन दररोज वापरासाठी कलात्मक रित्या सजवलेली माझी स्वच्छतेची पेटी विदयार्थ्यांनी तयार करावी. या पेटीमधे नेलकटर , कंगवा, साबण ,रुमाल , केसांचा पट्टा ,पेपरसोप ,सॅनिटायझर ,टुथब्रश ,हॅण्डवॉश लिक्वीड इ.साहित्य त्या विदयार्थ्याने दररोज वापरासाठी ठेवावे. कार्यानुभव या सदरात संबंधित विदयार्थ्यांचे मुल्यमापन व्हावे व त्या प्रमाणे सुदंर कलात्मक टाकाऊ पासुन टिकाऊ केलेली ही पेटी इतरांना दाखवावी.

**९. प्रदुषन (फटाके ) मुक्त दिवाळीची शपथ**

जिल्हा परिषदेच्या शाळेतील सर्व विद्यार्थि ही दिवाळी प्रदुषण होणार नाही. यासाठी फट़ाके मुक्त साजरी करतील व आपल्या शेजारील मुले ही फटाके वाजणार नाहीत. यासाठी त्यांनाही समावुन सांगतील व स्वच्छते विषयक फटाके मुक्त दिवाळीसाठी खालील प्रमाणे दिवाळी सुट्टी लागण्याच्या शेवटच्या दिवशी शिक्षक विद्यार्थ्यांना शपथ देतील .

आम्ही अशी शपथ घेतो की , यावर्षी आम्ही प्रदुषण मुक्त व फटाके मुक्त दिवाळी साजरी करु व निर्सगाचे सौंदर्य बिघडणार नाही यासाठी प्रयत्न करु आणि अभिमान वाटावा गावास सा-या असे वर्तन करु. जय स्वच्छता ।जय भारत।

वरील प्रमाणे **" अभिमान वाटावा गावास सा-या ... "** विदयार्थ्यांच्या स्वच्छता अभियानाचे कायम स्वरुपी स्वच्छतेच्या चळवळीत रुपांतर व्हावे. अशा अपेक्षेने दिवाळी सुट्टीतील हा उपक्रम यशस्वी व्हावा. अशी अपेक्षा आहे.

अमोल येडगे (भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद बीड**

**प्रतिलिपी**

१) **उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पापुस्व) यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव**

अमोल येडगे (भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद बीड**